# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, कृषि नगर, अकोला – ४४४१०४
## अर्थ प्रशासन विभाग

दुरध्वनी क्र.०७२४-२२५८४६९ फॅक्स क्र.०७२४-२४५८८७३

**नियंत्रक : श्री. जे.एस. मानमोठे** E- mail: comptroller@pdkv.ac.in


जा.क्र. वि.प्र.वि./अंदाज/भाकृअप/२०२१-२२/ 1029

दिनांकः 30.09.2021

प्रति,

सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख/प्रभारी अधिकारी/
आहरण व संवितरण अधिकारी, डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला.

विषयः- तक्रारकर्ते कार्यकारी परिषद सदस्य मा. श्री. मोरेश्वर वानखडे यांचे तक्रार अर्जानुसार भारतीय कृषि अनुसंधान परिषदेमार्फत प्राप्त होणा-या सी.ए.ग्रॅन्ट (**Central Assistant Grants**) अनुदानाच्या गैरवापर संदर्भात गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीसमोर अभिलेख उपलब्ध करुन देणेबाबत.

संदर्भः-वित्तीय सल्लागार, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, कृषि परिषद, पुणे यांचे पत्र क्रं. जा. क्रं. मकृप/लेखा-१/१७२०/सीएग्रॅन्ट-चौकशी/२०२१ दिनांक ०६/०९/२०२१.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख/प्रभारी अधिकारी/आहरण व संवितरण अधिकारी यांना कळविण्यात येते की, कार्यकारी परिषद सदस्य मा. श्री. मोरेश्वर वानखडे यांनी भारतीय कृषि अनुसंधान परिषदेमार्फत विद्यापीठास प्राप्त होणा-या सी.ए.ग्रॅन्ट (**Central Assistant Grants**) अनुदानाच्या गैरवापर संदर्भात तपासणी करण्याबाबत कृषि परिषदेस विनंती केली आहे. त्यामुळे वित्तीय सल्लागार, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी संदर्भिय पत्र क्रं. ०१ अन्वये विद्यापीठाला मागील १० वर्षात प्राप्त झालेल्या सी.ए.ग्रॅन्ट अंतर्गत रु. ३.०० लाखापेक्षा जास्त रक्कमांच्या कामांची विभागणी करुन अवलंबलेली खरेदी प्रक्रिया, कोटेशन पध्दतीने झालेल्या विविध खरेदी, व संबंधित नस्ती या अभिलेख्यांची सखोल तपासणी करुन सविस्तर अहवाल कृषि परिषदेस दि. ०५/१०/२०२१ पर्यंत सादर करण्याबाबत सुचित केले आहे.

नियंत्रक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे स्तरावर सदर अभिलेख्यांची तपासणी करण्याकरीता तपासणी समिती गठीत करण्यात आलेली आहे. करीता विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख/प्रभारी अधिकारी/आहरण व संवितरण अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, मागील १० वर्षात आपल्या विभागाने सी.ए.ग्रॅन्ट (**Central Assistant Grants**) अंतर्गत झालेला खर्च व त्याकरीता अवलंबलेली खरेदी प्रक्रियांची नस्ती यांची सखोल तपासणी करण्याकरीता संबंधित अभिलेखे या कार्यालयास दि. ०४.१०.२०२१ पर्यंत उपलब्ध करुन देण्यात यावी, जेणेकरुन सदर अभिलेख्यांची तपासणी करुन सविस्तर अहवाल विहीत कालमर्यादेत शासनास सादर करणे सोईचे होईल, याची कृपया दक्षता घ्यावी.

स्वा-
नियंत्रक,
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

प्रतिलिपीः-

१) मा. वित्तीय सल्लागार, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, कृषि परिषद, भोसलेनगर, पुणे
२) मा. अधिष्ठाता(कृषि), डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.
३) मा. कुलगुरु महोदय यांचे स्विय सहायक यांना मा. कुलगुरु महोदय यांचे माहीतीस्तव.
४) मा. प्रभारी अधिकारी, कृषी संशोधन संगणक प्रणाली माहीती कक्ष, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला, यांना विद्यापीठ संकेतस्थळावर परिपत्रक प्रसिध्दीसाठी अग्रेषित.

नियंत्रक,
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला